# नियमित दिवाणी मुकदमा नं.८६/२०१३ मधील निशाणी ४७ वरील आदेश

( CNR NO. MHRG14-000540-2013)

१. वादींनी सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश–६, नियम–१७ प्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्तीकरीता दाखल केला आहे.

२. वादींनी सदर कामी अर्जात नमूद केल्याप्रमाणे खालीलप्रमाणे दुरुस्ती मागितली आहे.

अ) दावा कलम '१२' चे शेवटी ''वर पत्र हे वादाकरीता नोटीस होती असे धरले, तर जोपर्यंत संपादनाची प्रक्रिया रद्द होत नव्हती अथवा संपादन राहणार आहे किंवा कसे याबाबतच अंतिम निर्णय होत नव्हता, तोपर्यंत प्रतिवादी हे देखील व्यवहार पूर्ण करणार व कसे हे उत्तर देऊ शकत नव्हते व त्यामुळे वर नमूद केलेप्रमाणे वादीने देखील प्रतिवादींचे आश्वासनांवर काही काळ थांबण्याचे ठरविले होते.'' असा मजकूर टाकणे. तसेच

ब) दावा कलम १५ मध्ये वादीचे म्हणणे असे की, या शब्दानंतर ''दावा मिळकतीची संपादनाची प्रक्रिया रद्द होवून देखील प्रतिवादी दावा मिळकतीचे खरेदीखत करुन देणेस टाळाटाळ करीत असल्याने'' असा मजकूर टाकणे.

३. सदर अर्जावर प्रतिवादींनी त्यांचे म्हणणे दाखल करुन हरकत घेतली व अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. वादींचा अर्ज, प्रतिवादींचे म्हणणे व अभिलेख वाचून पाहीला. वादी व प्रतिवादींचे वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

५. वादी व प्रतिवादी यांचे परस्पर विरोधी कथनांवरुन खालील मुद्दे विचारार्थ आले आहेत. सदरचे मुद्दे आणि त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसहीत खालीलप्रमाणे आहेत.

| अ.नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्ज मंजूर होणेस पात्र आहे काय ? | होकारार्थी |
| २. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

**कारणमिमांसा**

**मुद्दा क्रमांक १ व २ बाबत –**

६. उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करता वादींनी मागितलेली दावा दुरुस्ती ही दाव्यातील मुददे निश्चितीच्या पूर्वीची आहे. सदर कामी अदयाप मुददे निश्चित होवून पुरावा सुरु झालेला नाही. वादीचे असे कथन आहे की, दाव्याच्या प्रतिवादनांबाबत अधिक स्पष्टता येण्यासाठी वाढीव खुलासा व मजकूर दाव्यात नमूद करणे आवश्यक आहे. सदरचे कारण योग्य वाटते. सदर कामी दावा दुरुस्ती झाल्यास प्रतिवादीस पुन्हा जादा कैफियत देवून त्याबाबत म्हणणे मांडता येणार आहे. वादींच्या अनावधानाबाबत वादींवर दंड आकारुन सदर दुरुस्ती मंजूर करता येणे शक्य आहे. सदर दावा दुरुस्ती करु न दिल्यास उभय पक्षकारांचे वादातीत मुददे निश्चित करुन त्यावर योग्य न्यायनिर्णय होणार नाही. सबब, सदरची दावा दुरुस्ती मंजूर करणे योग्य होईल.

७. सदरचा दावा दुरुस्ती अर्ज मंजूर झालेस दावा गुणदोषांवर न्यायनिर्णीत करणेस मदत होणार आहे. सदरचा अर्ज मंजूर केलेस प्रतिवादींचे नुकसान होणार नाही. त्यामुळे नैसर्गिक न्यायाला अनुसरुन व दोन्ही पक्षकारांचे हित लक्षात घेवून सदरची दावा दुरुस्ती मंजूर

होणे न्यायोचित होणार आहे. सबब, वरील विवेचनावरुन मी मुद्दा क्रमांक १ साठी होकारार्थी मत नोंदवत आहे व मुद्दा क्रमांक २ साठी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

| | |
|---|---|
| १. | वादींचा अर्ज रक्कम रु.१०००/- चे खर्चासह मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | सदर खर्चाची रक्कम वादींनी प्रतिवादी यांना पुढील तारखेचे आत द्यावी. |
| ३. | वादींनी दाव्यामध्ये खर्चाची रक्कम भरल्यानंतर विहीत कालावधीत योग्य ती नियोजीत दुरुस्ती करावी. |
| ४. | वादींनी दुरुस्त दाव्याची प्रत न्यायालयासाठी व प्रतिवादींसाठी दयावी. |

WALI NILESH MALAKAPPA
Digitally signed by WALI NILESH MALAKAPPA
Date: 2023.01.09 12:30:16 +0530

ठिकाण –उरण
दिनांक – ०७.०१.२०२३.

(निलेश एम.वाली )
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, उरण.